डॉ. अरुण प्रभुणे
'चिंतामणी' बंगला, श्री नगर कॉलनी,
उदगीर 413 517 जि. लातूर
फोन : 02385-257422
मो. 9422468062
arun_prabhune@yahoo.co.in

# आजची मनोरंजनाची माध्यमे आणि अभिरुची

( दि. १४-१५-१६ फेब्रुवारी २००९, पहिले मराठी विश्व साहित्य संमेलन, सॅन होजे, अमेरिका येथील परिसंवादात वाचलेला निबंध )

मनोरंजनाची माध्यमे आणि अभिरुची या दोन्ही शब्दांमागील आशय आधी स्पष्ट करणे आवश्यक आहे.

मनोरंजन करून घेणे ही मानवी मनाची आत्यंतिक स्वरूपाची गरज असते. मनोरंजन म्हणजे विविध उपायांनी मनाचे होणारे रंजन. अनेक माध्यमांतून माणूस स्वतःचे रंजन करून घेत असतो. मनोरंजनाची नवी नवी माध्यमे तो शोधून काढीत असतो. म्हणून ही माध्यमे नेहमी बदलत असतात. मनोरंजनाच्या त्याच त्या माध्यमांचा माणसाला कंटाळा येतो. माणसाला नेहमी बदल हवा असतो म्हणून कोणत्याही गोष्टीचा त्याला कंटाळा येत असतो तसाच तो मनोरंजनाच्या माध्यमांचाही येत असतो. जीवनात त्याला सतत बदलाची अपेक्षा असते आणि असे बदल तो नेहमी अनुभवीत असतो.

## राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीमुळे जीवनात बदल :

माणसाच्या व मानवसमूहाच्या जीवनात बदल होतात ते मुख्यतः बदलणा-या राजकीय, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीमुळे. त्या त्या मानवसमूहाच्या जीवनविषयक, धर्मविषयक, नीतिविषयक, स्त्री-पुरुषसंबंधविषयक कल्पना इत्यादी गोष्टींमध्ये यामुळे बदल घडून येत असतो. या सर्व बदलांना स्वीकारून जेव्हा तो मानवसमूह जगू लगतो तेव्हा यालाच 'कालमानानुसार होणारे जीवनशैलीकल्पनांतील बदल' असे आपण संबोधित असतो. यालाच आपण 'कालमानानुसार जीवनशैली बदलत असते' असही म्हणत असतो.

## मनोरंजनाच्या माध्यमांचा संबंध सरळ जीवनशैलीशी असतो :

जीवनशैलीच बदलू लागली की जीवनोपयोगी सर्वच गोष्टी आपोआप बदलू लागतात. नवी जीवनशैली यामुळेच नवी मनोरंजनाची साधने व नवी मनोरंजनाची माध्यमे घेऊन येत असते. म्हणून कोणत्याही काळात त्या काळातील जीवनशैलीतून मनोरंजनाची माध्यमे जन्मत असतात. मनोरंजनाची जन्मलेली ही माध्यमे त्या काळातील जीवनशैलीला आश्रय व उत्तेजन देणारी असतात. त्या जीवनशैलीला दृढमूल करणारी असतात. मनोरंजनाच्या माध्यमांचा संबंध सरळ जीवनशैलीशी असतो तो हा असा.

उदाहरणार्थ इंग्रजराज्यकर्त्यांची भौतिकतावादी जीवनशैली भारतीयांनी जवळून पाहण्याआधी व यथावकाश हळूहळू स्वीकारण्यास अनुकूलता दाखवण्याआधी भारतीयांची पारंपरिक आधिभौतिकतेला केंद्रस्थानी मानणारी जीवनशैली होती. ईशभक्ती व मोक्षप्राप्ती हे भारतीयांच्या जीवनाचे ईप्सित होते. म्हणून सर्व जीवनव्यवहारांना या ईप्सिताची कायम किनार असणे स्वाभाविक होते. यामुळेच या काळातील मनोरंजनाची माध्यमे केवळ भौतिक पातळीवरील मनोरंजन करणारी नव्हती. भक्तीला मनोरंजनाची जोड दिलेली असायची किंवा मनोरंजनाला भक्तीची जोड दिलेली असायची.

भक्तीच्या प्रेरणेतून जन्मलेले प्राचीन मराठी वाङ्मय आणि या वाङ्मयाचा भजन, प्रवचन, कीर्तन, भारुड, गोंधळ, बहुरूपी, दशावतार इत्यादी दृश्य माध्यमातून आविष्कार करून आधिभौतिकतावादी जीवनशैलीला आश्रय व उत्तेजन देणारी माध्यमे जन्माला आली होती. ही सर्व जशी भक्तीची माध्यमे होती तशीच ती त्या काळातील मनोरंजनाचीही माध्यमे होती. या ठिकाणी भौतिकता अपेक्षित नव्हती. आधिभौतिकता केंदस्थानी असल्याने या माध्यमांचा निर्माता आणि वाचक, श्रोता वा प्रेक्षक यांची या संदर्भातील अभिरुची कशी होती हा मुद्दाच उपस्थित होत नसे. उच्छृंखल अभिरुची, बाजारू अभिरुची असे शब्द इथे गैरलागू होते. भक्तिनीतीचा बोध मुख्यतः अपेक्षित असल्याने 'सभ्य' 'सात्विक' सदभिरुचीयुक्त लेखन, सादरणीकरण व श्रवण इथे अपेक्षित होते. तमाशासारख्या मनोरंजनाच्या माध्यमालासुद्धा या अध्यात्मप्रवण जीवनशैलीमुळे भेदिक लावण्यांची निर्मिती करावी लागली होती.

भौतिक शोधांमुळे रेडिओ, टी.व्ही., सी.डी., डी.व्ही.डी. अशी अनेक प्रकारची मनोरंजनाची अ-पूर्व साधने व माध्यमे निर्माण झाली. भौतिकतावादी जीवनशैलीमुळे त्यावरील कार्यक्रम भौतिकतावादाला व त्यातून जन्मणा-या चंगळवादाला आश्रय व उत्तेजन देणारे असणे स्वाभाविक आहे. आज बहुतांश कार्यक्रम तसेच आहेत. अर्थातच अभिजात रसिकता, तरल संवेदनक्षमता, सदभिरुची यांना जागा मिळणे यामुळे अवघड होऊ लागले आहे. आजच्या जीवनशैलीत ईशभक्तीऐवजी ऐश-आराम, पैसा व सुखलोलुपता या गोष्टी जीवनाच्या केंद्रस्थानी मानल्या जाऊ लागल्यामुळे मनोरंजनाच्या माध्यमांना सदभिरुचीची पर्वा करण्याची आवश्यकता वाटणे शक्य नाही आणि रसिकही अशी अपेक्षा करीत नाही. जीवनशैली आणि मनोरंजनाची माध्यमे यांच्यात अतूट नाते असते ते हे असे.

<u>जीवनशैली आणि अभिरुची यांचे नाते असते</u> :

जीवनशैली आणि मनोरंजनाची माध्यमे यांच्यात जसे अतूट नाते असते तसेच जीवनशैली आणि अभिरुची यांच्यातही अतूट नाते असते. जीवनशैलीचा प्रभाव ब-याच प्रमाणात आधी व्यक्तीच्या व नंतर समाजाच्या अभिरुचीवर पडत असतो. आपल्या असेही पाहण्यात येते की त्या मानवसमूहाची जीवनशैली त्या मानवसमूहाच्या अभिरुचीला एकतर घडवीत असते किंवा अभिरुचीत बदल तरी घडवीत असते. यावेळी दोन गोष्टी घडतात. एक म्हणजे चोखंदळ अभिरुची असलेली रसिकता जन्माला येते. यालाच आपण अभिजात अभिरुची किंवा रसिकता म्हणून ओळखतो. कनिष्ठ दर्जाची अभिरुची असलेली रसिकताही त्या मानवसमूहाच्या जीवनशैलीतूनच जन्माला येत असते. यालाच आपण

अभिरुचिहीनता वा अभिरुचिशून्यता वा बाजारू अभिरुची म्हणून ओळखतो. याप्रकारे जीवनशैली आणि अभिरुची यांचे नाते असते.

सौंदर्याकडे नेणारी ती अभिरुची :

अभिरुची आणि जीवनशैली, अभिरुची आणि मनोरंजनाची माध्यमे यांच्या संबंधांचा शोध घेण्यापूर्वी अभिरुचीचा मूळ अर्थ आणि आशय यांचा आधी विचार करू.

अभिरुची या शब्दात अभि + रुचि अशी दोन पदे आहेत. यातील अभि या शब्दाचा अर्थ कडे, च्या दिशेस असा होतो. मात्र अभि हा शब्द मराठीत स्वतंत्रपणे योजला जात नाही. दुस-या शब्दाला जोडून येत असतो. उदा. अभिनय.

अभिरुची यातील दुसरा शब्द आहे रुची. शोभा, सौंदर्य, तेज, कांति असे अर्थ शब्दकोशात दिले आहेत. यातील शोभा व सौंदर्य हे अर्थ इथे अपेक्षित आहेत.

शोभादायकतेकडे नेणारी ती अभिरुची. सौंदर्याकडे नेणारी ती अभिरुची. अभिरुचीचा हा मूळ अर्थ. याचा अर्थ असा की अभिरुचिसंपन्नतेचा आणि उच्च संवेदनशीलतेचा अत्यंत जवळचा संबंध आहे. म्हणजे उच्च दर्जाच्या रसिकतेचे आणि अभिरुचिसंपन्नतेचे घनिष्ट नाते आहे. यामुळेच ज्याची अभिरुची उत्तम दर्जाची आहे त्या व्यक्तीला श्रेष्ठ कलावंत, रसिकश्रेष्ठ वा रसिकाग्रणी म्हणून गौरवले जाते. अशा रसिकाच्या ठिकाणी निसर्गतःच संवेदनशीलता असते. आस्वादक्षमता असते. आस्वादक्षमप्रतिभा असते. काळाप्रमाणे जीवनशैली बदलली, तीनुसार कलाविष्काराची माध्यमे बदलली, कलानिर्मितीविषयक कल्पना बदलल्या तरी सौंदर्याविष्काराच्या प्रयोजनाने जन्मणारी कलाकृती सौंदर्याविष्कारच करीत असते. त्या कालाकृतीचा आस्वादक सौंदर्यास्वादाचा श्रेष्ठ आनंद उपभोगीत असतो. कलाकृतीतील सुसंगतीचा म्हणजेच सौंदर्याचा आस्वाद घेण्याच्या आस्वादक्षमतेचा संबंध निश्चितच अभिरुचिसंपन्नतेशी आहे. 'शोभादायकतेकडे नेणारी ती अभिरुची. सौंदर्याकडे नेणारी ती अभिरुची.' अभिरुचीचा हा मूळ अर्थच आहे. सौंदर्यतत्त्व कालातीत असल्याने बदलणा-या काळाचा, काळानुसार बदलणा-या माध्यमांचा मूळ सौंदर्यास्वादाकडे नेणा-या अभिरुचीवर काहीही परिणाम होत नसतो. अशी व्यक्ती अभिजन म्हणून गौरवली जात असते.

उत्तम दर्जाची संवेदनशीलता माणसाचा दर्जा उंचावणारी असते. सामाजिक प्रतिष्ठाही उंचावणारी असते. अभिजन म्हणून मान्यता मिळवून देणारी असते. सौंदर्याची उपजत जाण असणारी व ही जाण व्यासंगाने अथवा रियाझाने वर्धित करणारी व्यक्ती अभिरुचिसंपन्न मानली जाते. अशा अभिरुचिसंपन्न कलावंत व रसिकांमुळे तो समाज सुसंस्कृत समजला जातो. अशा अभिरुचिसंपन्न व्यक्तीचा नकळत प्रभाव सर्व कलाव्यवहारावर पडत असतो. जीवनव्यवहारावरही पडत असतो.

असे अभिरुचिसंपन्न कलावंत व अभिरुचिसंपन्न रसिक जगात सर्वत्र व सर्व काळी असतात. अर्थातच त्यांची संख्या मर्यादित असते. असे कलावंत व रसिक कलेकडे मनोरंजनाचे साधन म्हणून पाहत नसतात आणि मनोरंजनासाठी स्वकालीन माध्यमांकडे वळले तर सदभिरुचिपूर्ण मनोरंजनच त्यांचे रंजन

करू शकत असते. अशिष्ट, बीभत्स, असदभिरुचिपूर्ण अर्थात सौंदर्यहानीची तमा न बाळगणारे मनोरंजनपर कार्यक्रम आणि असे कार्यक्रम सादर करणारी माध्यमे यांच्या पासून ते दूरच असतात.

मागणी तसा पुरवठा :

बदलणा-या जीवनशैलीप्रमाणे आणि काळाप्रमाणे प्रसिद्धी माध्यमे जरी बदलत असली तरी मनोरंजन करणे व करून घेणे याला नेहमीच मोठी मागणी असते. इहवादी जीवनशैलीला आज आपण जवळ करीत असल्याने वृत्तपत्रे, मासिके, ललित वाङ्मय, रेडिओ, चित्रपट, टी.व्ही.च्या वेगवेगळ्या वाहिन्या या द्वारा कायम काही ना काही प्रसिद्ध होत असते या अर्थाने ही सर्व आजची प्रसिद्धीची व मनोरंजनाची माध्यमेच आहेत. यातून मोठ्या प्रमाणात मनोरंजन केले जावे अशी वाचक-प्रेक्षकांची अपेक्षा असते. मागणी असते. मागणीला पूर्ण करण्यासाठी तसा पुरवठाही केला जात असतो.

मुळात उच्च अभिरुचीचा रसिक अशा सवंग मनोरंजनाची अपेक्षाच करीत नसल्याने तो अशा माध्यमांतील ज्ञानवर्धक, चर्चात्मक, जिज्ञासा तृप्त करणा-या व बौद्धिक आनंद देणा-या कार्यक्रमांकडे वळतो. कलात्मक दर्जा असणा-या वाङ्मयीन कालकृतींकडे आणि कलात्मक चित्रपटाकडे व टी.व्ही.वरील कलात्मक कार्यक्रमांकडे वळतो. बाकी सामान्य वाचक व प्रेक्षक सवंग, कोणत्याही पातळीवरून मनोरंजन करणा-या अभिरुचीहीन, गल्लाभरू कार्यक्रमाचा वेडा होतो. सामान्यांची सामान्य बौद्धिक कुवत व सामान्य दर्जाची आवड लक्षात घेऊन गल्ल्यावर लक्ष ठेवणारा लेखक आणि निर्माता मग वाचक-प्रेक्षकांना भावप्रक्षुब्ध करणा-या गोष्टींचा पुरवठा करून अत्यंत बीभत्स, ओंगळवाणे, सवंग असे काही तरी पुरवीत असतो.

आज मूल्यविहीनतेला प्राप्त होऊ पाहणारी प्रतिष्ठा, प्रत्येक गोष्टीचे मार्केटिंग करण्याची वाढलेली वृत्ती, स्वातंत्र्याच्या गोंडस नावाखाली चालणारा स्वैराचार, आधुनिकतेच्या नावाखाली नग्नतेला मिळणारी प्रतिष्ठा, क्रौर्याची गाठली जाणारी परिसीमा, शिक्षेची न वाटणारी धास्ती, बळावत चाललेला बिनधास्तपणा व बेफिकीर वृत्ती याचा आढळ समाजात मोठ्या प्रमाणात होतो आहे. त्याचे प्रतिबिंब मनोरंजनाच्या आजच्या माध्यमांमध्ये पडणे स्वाभाविक आहे. या व अशा सर्व गोष्टींचे भडक, धारदार, वासना चाळवणारे, भावना प्रक्षुब्ध करणारे, भावविवश पातळीवरचे, स्वप्नरंजनात्मक चित्रण केले जाते आहे आणि दाखवले जाते आहे. अभिरुचिहीन सामान्य जनांची बरोबर नाडी ओळखणारी मनोरंजनाची माध्यमे सामान्य प्रेक्षकांना अति सामान्य वा सामान्यातिसामान्य बनवीत आहेत.

आजची भारतीयांची जीवनशैली जशी भौतिकतेत रस घेणारी आहे तशीच ती सर्व गोष्टींचे सुलभीकरण करण्याची आहे. विना कष्टात वा कमी कष्टात मान्यता मिळवण्याची आशा धरणारी आहे. अस्सलपेक्षा नक्कल महत्त्वाची समजणारी आहे. नक्कल आणि नक्कल करणारा या दोन्हींनाही मान्यता व प्रतिष्ठा बहाल करणारी आहे. मनोरंजनाचे सर्वात प्रभावी माध्यम असणा-या टी.व्ही.वर मूळ गायक गायिकांनी गायलेल्या गाण्यांची नक्कल करण्याला प्रोत्साहन व प्रतिष्ठा देणारे, कलेच्या क्षेत्रात पुढील आयुष्यात करियरच्या मोठ्या संधी चालून येण्याचे आमिष दाखवणारे आणि म्हणूनच की काय कमालीचे लोकप्रिय असलेले गाण्यांच्या स्पर्धांचे कार्यक्रम किंवा नक्कल करणारे अन्य नृत्याच्या स्पर्धांचे

कार्यक्रम समाजाच्या अभिरुचिशून्यतेची जणू पावतीच देणारे आहेत ! समाजातील अनेक मान्यवर बुजुर्ग गायक, गायिका आणि प्रतिभावंतांनी या विषयी नापसंतीही व्यक्त केली आहे.

आजची अशी जीवनशैली आणि असे नक्कलांना प्रतिष्ठा देणारे मनोरंजनमाध्यमांतील कार्यक्रम बघता जीवनशैली आणि अभिरुची यांच्या अतूट नात्यावर चांगला प्रकाश पडू शकतो.

अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्या सर्व उदाहरणांवरून हेच सिद्ध होईल की –

१. अनेक कारणांनी बदलणा-या जीवनशैलीमुळे मनोरंजनाची माध्यमे बदलत असतात.
२. जीवनशैली आणि मनोरंजनाची माध्यमे यांत अतूट नाते असते.
३. जीवनशैली आणि अभिरुची यांच्यात अतूट नाते असते.
४. सदभिरुची अभिजात सौंदर्याच्या शोधात असते.
५. अभिजात रसिकता कालनिरपेक्ष असते.

डॉ. अरुण प्रभुणे
arun_prabhune@yahoo.co.in

डॉ. अरुण प्रभुणे
'चिंतामणी' बंगला, श्री नगर कॉलनी,
उदगीर 413 517 जि. लातूर
फोन : 02385-257422
मो. 9422468062
arun_prabhune@yahoo.co.in